राज्यातील तापमानात चढ-उताराचा अंदाज

पुणे : राज्यातील कोरडे हवामान आणि उत्तरेकडून काही प्रमाणात थंड वारे येत असल्याने प्रामुख्याने मध्य महाराष्ट्र आणि कोकण विभागातील रात्रीच्या किमान तापमानात घट होऊन हलका गारवा निर्माण झाला आहे. विदर्भ आणि मराठवाड्यात काही भागांत किमान तापमान सरासरीच्या आसपास आहे. पुढील आठवडाभर तापमानात चढ-उतार होण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

पावसाची शक्यता

पश्चिमी चक्रवातामुळे पंजाब, हरियाणा, चंडीगड आणि दिल्ली या भागांत २२ ते २४ जानेवारी दरम्यान पावसाचा अंदाज आहे. २३ जानेवारीच्या आसपास जम्मू, काश्मीर आणि हिमालयाच्या काही भागांत हिमवृष्टी होण्याचा अंदाज आहे. त्यामुळे या काळात राज्यातील तापमानात चढ-उतार होणार आहे. दोन दिवसांत काही प्रमाणात तापमानवाढ होऊन पुन्हा ते कमी होण्याची शक्यता आहे.

कमी दाबाचे पट्टे आणि ढगाळ स्थितीमुळे राज्यात अद्यापही कडाक्याची थंडी अवतरलेली नाही. सध्या राज्यातील हवामान कोरडे झाले आहे. त्याच बरोबरीने उत्तरेकडील काही राज्यांमध्ये कडाक्याची थंडी असल्याने तेथून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे मध्य महाराष्ट्र आणि कोकण विभागातील किमान तापमानात गेल्या आठवड्याच्या तुलनेत मोठी घट झाली आहे. मध्य महाराष्ट्रात सरासरीपेक्षा ७ ते ८ अंशांनी अधिक असणारे किमान तापमान आता काही भागात सरासरीच्या आसपास आले आहे. त्यामुळे हलका गारवा आहे. कोकण विभागातही तशीच स्थिती आहे. मराठवाड्यातील नांदेड वगळता इतरत्र किमान तापमान सरासरीच्या २ ते ३ अंशांनी अधिक आहे. विदर्भातील किमान तापमान सरासरीच्या तुलनेत २ ते ३ अंशांनी अधिक आहे. गुरुवारी नाशिक येथे राज्यातील नीचांकी ११.४ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली.

अमली पदार्थांचा साठा हस्तगत

मुंबई : परराज्यातून कुरिअरद्वारे आयात केलेल्या कोडीन मिश्रित अमली पदार्थांचा १२ लाख रुपयांचा साठा साकीनाका पोलिसांनी हस्तगत केला आहे. कारवाईत पोलिसांनी क्लोर्फेनिरामाइन मालिएट आणि कोडीन फॉस्फेट सिरपच्या १०० मिली औषधाच्या ५६ बॉक्समधील ७ हजार २६८ बाटल्या जप्त केल्या.

याप्रकरणी पोलिसांनी तौसिफ मोहम्मद शरीफ शेख (३४) याला अटक केली आहे. वस्त्यांमध्ये स्वतात नशा करण्यासाठी या औषधांचा वापर केला जाणार होता.

आरोपींनी 'टीसीआय एक्स्प्रेस' या कुरिअर कंपनीद्वारे मुबारक केमिस्ट या दुकानाच्या नावाने औषधांचा साठा मागविला होता. हा औषधांचा साठा मुंबईत येताच कुरिअर कंपनीने मुबारक केमिस्टच्या मालकांना संपर्क साधून औषधे घेऊन जाण्यास सांगितले. मात्र मुबारक केमिस्टने कोणतीही औषधे मागविली नसल्याने त्यांनी याची माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाला दिली.

दरम्यान, पोलिसांच्या कारवाईच्या भीतीने तौसिफ आणि त्याचा साथीदार हा औषधांचा साठा घेण्यासाठी येत नव्हते. त्यामुळे पोलिसांनी कुरिअर कंपनीच्यामार्फत आरोपींना विश्वासात कुरिअर घेण्यासाठी बोलाविले. पोलीस निरीक्षक बुधन सावंत यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक उमेश दगडे आणि हनुमंत ढवण यांच्या पथकाने सापळा रचून तौसिफ याला अटक केली.

महागाई भत्ता गोठविण्यास अंतरिम स्थगिती

मुंबई : मुंबईतील बंदर व गोदी कामगारांचा एक टक्का महागाई भत्ता गोठविण्याच्या पोर्ट ट्रस्ट प्रशासनाच्या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयाने अंतरिम स्थगिती दिली आहे. या संदर्भात पुढील सुनावणी ९ फेब्रुवारीला होणार आहे, अशी माहिती मुंबई मुंबई पोर्ट ट्रस्ट, डॉक अँड जनरल एम्प्लॉईज युनियनचे सरचिटणीस सुधाकर अपराज व ट्रान्सपोर्ट अँड डॉक वर्कर्स युनियनचे सरचिटणीस केरशी पारेख यांनी दिली.

पुढील सुनावणी ९ फेब्रुवारी २०२१ रोजी होणार आहे. त्यावेळी केंद्रीय नौकानयन मंत्रालयाच्या प्रतिनिधींना हजर राहण्यास न्यायालयाने सांगितले आहे, अशी माहिती मुंबई मुंबई पोर्ट ट्रस्ट, डॉक अँड जनरल एम्प्लॉईज युनियनचे प्रसिद्धी प्रमुख मारुती विश्वासराव यांनी दिली.


बारावीची परीक्षा २३, तर दहावीची २९ एप्रिलपासून

शिक्षणमंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांची घोषणा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

मुंबई : करोनामुळे शैक्षणिक वर्षाला झालेल्या विलंबाच्या पार्श्वभूमीवर यंदा बारावीची लेखी परीक्षा २३ एप्रिल, तर दहावीची परीक्षा २९ एप्रिलपासून सुरू होणार असल्याची घोषणा शालेय शिक्षणमंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांनी गुरुवारी केली.

राज्यात आजवर बारावीच्या परीक्षा फेब्रुवारी, तर दहावीच्या परीक्षा मार्चमध्ये होऊन निकाल जूनमध्ये लागत होते. मात्र, या वेळी करोनामुळे शैक्षणिक वर्षाचे वेळापत्रक बिघडले. शाळा, महाविद्यालये काही दिवसांपासून सुरू झाली आहेत. मुंबई महानगर प्रदेशातील शाळा-महाविद्यालये अद्यापही बंदच असून, विद्यार्थ्यांचे शिक्षण ऑनलाइन पद्धतीने सुरू आहे. त्यामुळे परीक्षाही लांबणीवर गेल्या आहेत. बारावीची प्रात्यक्षिक परीक्षा १ ते २२ एप्रिलदरम्यान होईल तर लेखी परीक्षा



बारावी
- प्रात्यक्षिक परीक्षा : १ ते २२ एप्रिल
- लेखी परीक्षा : २३ एप्रिल ते २९ मे
- निकाल : जुलैअखेर

दहावी
- प्रात्यक्षिक परीक्षा : ९ ते २८ एप्रिल
- लेखी परीक्षा : २९ एप्रिल ते ३१ मे
- निकाल : ऑगस्टअखेर

२३ एप्रिल ते २९ मे या कालावधीत घेण्यात येईल. या परीक्षेचा निकाल जुलैच्या शेवटच्या आठवड्यात जाहीर करण्यात येईल. दहावीच्या प्रात्यक्षिक परीक्षा ९ ते २८ एप्रिल यादरम्यान होतील तर लेखी परीक्षा २९ एप्रिल ते ३१ मे या कालावधीत घेण्यात येतील. या परीक्षेचा निकाल ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात जाहीर करण्यात येईल.

करोनाबाबत केंद्र आणि राज्य सरकार, आरोग्य विभागाने वेळोवेळी जाहीर केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन, तसेच विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेऊन परीक्षा प्रक्रिया पार पडेल.

राज्यात नववी ते बारावीच्या वर्गांमध्ये दिवसेंदिवस विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढत असून, १८ जानेवारीला २१ लाख ६६ हजार ५६ विद्यार्थी शाळांमध्ये उपस्थित होते. शाळांमधील विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचे प्रमाण ७६.८ टक्के असल्याचे प्रा. वर्षा गायकवाड यांनी सांगितले.

बेकायदा बांधकामप्रकरणी सोनू सूदला तडाखा

मुंबई पालिकेची कारवाई योग्य असल्याचा उच्च न्यायालयाचा निर्वाळा

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : कायद्याचा सन्मान करणाऱ्यांबाबतच नरमाई दाखवली जाऊ शकते, असे नमूद करत बेकायदा बांधकामप्रकरणी अभिनेता सोनू सूदला पालिकेने पाठवलेली नोटीस उच्च न्यायालयाने गुरुवारी योग्य ठरवली. तसेच पाडकाम तूर्त सुरू न करण्याचे आदेश देण्याची सोनूची मागणीही न्यायालयाने फेटाळली.

न्यायालयात येण्यास तुम्ही खूप उशीर केला आहे. तुमच्याकडे पुरेशी संधी उपलब्ध होती. आताही तुम्हाला बांधकाम नियमित करायचे असल्यास पालिककडे तसा अर्ज करावा. पालिका त्यावर योग्य तो निर्णय घेईल, असेही न्यायालयाने म्हटले.

सूद आणि पालिकेचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने याचिकेवरील निर्णय राखून ठेवला होता. गुरुवारी न्यायालयाने या प्रकरणी निकाल देताना सूदची याचिका फेटाळली.

झाले काय? : पालिकेने नोटीस बजावल्यावर सोनू सूदने कनिष्ठ न्यायालयात धाव घेत पालिकेची नोटीस रद्द करण्याची मागणी केली होती. कनिष्ठ न्यायालयाने त्याची ही मागणी फेटाळली होती. त्याच वेळी आदेशाविरोधात अपील करण्यासाठी त्याला वेळ देताना त्याच्यावर कारवाई करण्यास पालिकेला मज्जाव केला होता. सोनूने कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

बेकायदा बांधकामप्रकरणी वारंवार नोटीस बजावून आणि कारवाई करूनही सोनू सूदने कायद्याचे उल्लंघन करणे थांबवले नाही. त्यामुळे तो वारंवार कायदे मोडणारा गुन्हेगारच आहे, असा दावा पालिकेने युक्तिवाद करताना केला होता. तसेच त्यास कारवाईपासून कोणताही दिलासा देऊ नये, अशी मागणी केली होती.

'बंगबंधू' चरित्रपटाच्या चित्रिकरणाला मुंबईत सुरुवात

श्याम बेनेगल यांचे दिग्दर्शन, भारत-बांगलादेशची सहनिर्मिती

लोकसत्ता खास प्रतिनिधी

मुंबई : बांगलादेशचे राष्ट्रपिता बंगबंधू शेख मुजीबूर रहमान यांच्या आयुष्यावर आधारित चरित्रपटाच्या चित्रिकरणाला गुरुवारपासून सुरुवात झाली. शेख मुजीबूर रहमान यांच्या जन्मशताब्दी सोहळ्याचे औचित्य साधून भारत आणि बांगलादेश यांच्या संयुक्त विद्यमाने 'बंगबंधू' या चित्रपटाची निर्मिती केली जात आहे.



शेख मुजीबूर रहमान

ऐतिहासिक महत्त्व...
- बांगलादेश स्वतंत्र व्हावा यासाठी शेख मुजीबूर रहमान यांनी दिलेला लढा, त्यासाठी भारताने बांगलादेशाला दिलेले सहकार्य याचा इतिहास खूप मोठा आणि तितकाच महत्त्वाचा आहे. बांगलादेश स्वतंत्र झाल्यापासून या दोन्ही देशांत मैत्रीपूर्ण संबंध आहेत.
- दोन वर्षांपूर्वी राष्ट्रीय नागरिकत्व दुरूस्ती कायदा मंजूर झाल्यानंतर दोन्ही देशांमध्ये काही काळ चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. या सगळ्या घटनांच्या पार्श्वभूमीवर दोन्ही देशांच्या सहकार्यातून तयार होत असलेल्या 'बंगबंधू' या चित्रपटाकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.
- या चित्रपटात बांगलादेशी कलाकार मुख्य भूमिकेत असणार आहेत. बांगलादेशी अभिनेते आरिफिन शुवू हे या चित्रपटात शेख मुजीबूर रहमान यांची भूमिका साकारणार आहेत. अतुल तिवारी आणि शमा झैदी यांनी चित्रपटाची पटकथा लिहिली असून संगीत शंतनू मोईत्रा यांचे असणार आहे.

ज्येष्ठ दिग्दर्शक श्याम बेनेगल या चित्रपटाचे दिग्दर्शन करत असून दादासाहेब फाळके चित्रनगरीत गुरुवारी या चित्रपटाचे मुहूर्त दृश्य घेण्यात आले.

भारत आणि बांगलादेश यांच्यात दृक्श्राव्य सहनिर्मिती करारांतर्गत या चित्रपटाच्या निर्मितीची घोषणा गेल्यावर्षी १४ जानेवारीला करण्यात आली होती. राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळ (एनएफडीसी) आणि बांगलादेश चित्रपट विकास महामंडळ यांच्यात या चित्रपटनिर्मितीचा करार झाला होता. करारानुसार गेल्यावर्षी मार्च महिन्यात बांगलादेशमध्ये चित्रिकरणाचा पहिला टप्पा पार पडणार होता, मात्र करोनामुळे हे चित्रिकरण सुरू होऊ शकले नाही. आता दादासाहेब फाळके चित्रनगरीत या चित्रपटाच्या पहिल्या टप्प्यातील चित्रिकरणाला सुरुवात झाली असल्याची माहिती दिग्दर्शक श्याम बेनेगल यांनी दिली.

पहिल्या टप्प्यातील चित्रिकरण एप्रिलपर्यंत पूर्ण होणार असून त्यानंतर उर्वरित चित्रिकरण बांगलादेशमध्ये करण्यात येणार आहे. सध्या या चित्रपटाच्या चित्रिकरणाचे काम वेगाने सुरू झाले असून त्यातच आपण व्यग्र आहोत. चित्रिकरणाचा अर्धा टप्पा पूर्ण झाल्यानंतरच आपल्याला चित्रपटाविषयी सविस्तर माहिती देता येईल, असे बेनेगल यांनी स्पष्ट केले.

सार्वजनिक सूचना

याद्वारे सूचित करण्यात येते की, आमच्या अशिलांनी **अपर्णा मोटर्स प्रायव्हेट लिमिटेड** या कंपनी कायदा २०१३ अंतर्गत नोंदणीकृत झालेल्या कंपनीकडून जिचा सीआयएन यु९९९९९एमएच१९९५पीटीसी०८८९४६ असून जिचे नोंदणीकृत कार्यालय प्लॉट क्र. बी-२७, वागळे टेलिफोन एक्सचेंज च्या समोर, वागळे इस्टेट, ठाणे (पश्चिम) ४००६०४ **('मालक')** येथे असून याखाली दिलेल्या परिशिष्टात वर्णन केलेल्या मालमत्तेचे सर्व मालकी हक्क, अधिकार व हितसंबंध प्राप्त करण्यासाठी चर्चा व विनिमय करून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य केले आहे.

भूखंडाची खालील मूळ कागदपत्रे मालकाकडे उपलब्ध नाहीत आणि गहाळ झालेली आहेत तरी ती योग्य प्रयत्न आणि शोध करुनही शोधली जाऊ शकत नाहीत.

या भूखंडावरील कर्जाची परतफेड करण्यासाठी सुरक्षा म्हणून शुल्क, तारण आणि परवाना घेण्याच्या उद्देशाने कोणतीही व्यक्ती किंवा संस्था तसेच कॉर्पोरेट किंवा वित्तीय संस्था यांच्याकडे जमा केलेली नाहीत.

१) दिनांक ०८ नोव्हेंबर १९६५ रोजीचे अभिहस्तांतरण पत्र मा. सह दुय्यम हमी निबंधक ठाणे यांच्या कार्यालयात तहन/११३१/१९६५ या क्रमांकावर प्रथम पक्ष कल्याणजी लालजी व १० इतर आणि द्वितीय पक्ष अबिद अ. पाटील व गोविंद बाबाजी पाटील यांच्यामध्ये नोंदणीकृत झाले आहे.

२) दिनांक ११ ऑक्टोबर १९६६ रोजीचे दुरुस्ती पत्र मा. सह दुय्यम हमी निबंधक ठाणे यांच्या कार्यालयात तहन/११८२/१९६६या क्रमांकावर प्रथम पक्ष कल्याणजी लालजी व १० इतर आणि द्वितीय पक्ष अबिद अ. पाटील व गोविंद बाबाजी पाटील यांच्यामध्ये नोंदणीकृत झाले आहे.

३) दिनांक २६ मे १९८६ रोजीचे अभिहस्तांतरण पत्र मा. सह दुय्यम हमी निबंधक ठाणे यांच्या कार्यालयात ३०९९/१९८६ या क्रमांकावर प्रथम पक्ष अबिद अ. पाटील व गोविंद बाबाजी पाटील यांच्यामध्ये नोंदणीकृत झाले आहे.

उपरोक्त कागदपत्रे किंवा यापैकी कोणतेही दस्तऐवज ताब्यात घेणाऱ्या किंवा ज्याचे त्यास ज्ञान आहे अशा व्यक्तीस त्वरीत लेखी अधोरेखित केलेल्या व्यक्तीला त्वरीत माहिती दिली जावी, आणि कागदपत्रे अधिकाऱ्यांना द्यावी. अशाप्रकारच्या सर्व व्यक्तींना याद्वारे माहिती देण्यात आली आहे आणि अशी चेतावणी देण्यात येते की, कागदपत्रांवर कोणत्याही प्रकारे व्यवहार करु नये. तसेच वरील हरवलेल्या कागदपत्रांच्या आधारे कोणाबरोबरही कोणताही व्यवहार केल्यास आमचा पक्षकार कोणत्याही गोष्टीस बंधनकारक किंवा जबाबदार असणार नही अशा बेकायदेशीर व्यवहाराची सुचना देण्यात येत आहे.

या भूखंडावर आणि किंवा त्याच्या कोणत्याही भागावर त्यावरील वास्तूरचना इमारत बांधकाम केलेले किंवा करावयाचे क्षेत्र यांवर कोणत्याही व्यक्तीचा विक्री हस्तांतरण बेचनपत्र विनियम हक्क हितसंबंध हिस्सा भाडेपट्टा उप भाडेपट्टा कूळ उपकूळ परवाना गहाण दान धारणाधिकार प्रभार बोजा कब्जा करारातील अट न्यास देखभाल वहिवाट अग्रहक्क वारसाहक्क मृत्यूपत्र ताबा आरक्षण कराराद्वारे विकासहक्क न्यायालयातील प्रलंबित खटले कौटुंबिक व्यवस्था समझोता न्यायालयाचा निवाडा किंवा कोणत्याही न्यायालयाचा आदेश किंवा भागीदारी किंवा अन्यथा कोणत्याही स्वरुपाचा किंवा कशाही स्वरुपात कोणताही दावा मागणी हक्क लाभ किंवा हितसंबंध असल्यास सदर व्यक्तीने त्याबाबतीतील पुराव्यादाखलच्या वैध प्रभावी दस्तऐवजांच्या छायाप्रतींसह खाली सही करणाऱ्यांना त्यांच्या कार्यालयात ही सूचना प्रकाशित झाल्यापासून चौदा (१४) दिवसांच्या आत लेखी स्वरुपात कळविणे आवश्यक आहे, अन्यथा असे दावे विचारात न घेता या भूखंडाच्या विक्रीचा व्यवहार आणि हस्तांतरण आमच्या अशिलांच्या नावे पूर्ण केले जाईल आणि असे काही दावे असलेच तर ते सोडून दिलेले आहेत असे समजण्यात येईल.

परिशिष्ट
(मालमत्तेचे वर्णन)

मीरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील काशिमीरा रस्त्यालगत महसुली गाव मीरा तालुका आणि उप नोंदणी जिल्हा ठाणे मीरा भाईंदर पिन ४०१ १०४ येथे स्थित भूखंड ज्यांचे सर्वे क्र.

सर्वे क्र.	जुना सर्वे क्र./हिस्सा क्र.	नवीन सर्वे क्र./हिस्सा क्र.	क्षेत्र (चौ.मी.)
१	५०/१/अ	१०३/१/अ	३,१३०.००
२	५०/१ब	१०३/१ब	३५०.००
३	५०/१/क	१०३/१/क	१००.००
४	५०/२	१०३/२	४००.००
५	५०/४	१०३/४	१७०.००
६	४८/२	१०५/२	४०४.२८
७	४८/६	१०५/६	७८०.००
८	४८/९	१०५/९	३७३.०८
९	४८/१०	१०५/१०	१५०.००
१०	४८/११	१०५/११	२०.००
		एकूण	**५,८७७.३६**

आणि ज्यांचे सध्याचे न भु क्र. १६१८, १६१९, १६७७, १६७६, १६७५, १६७४, १६७३, १६७२, १७९८ आणि १७९९ त्यांचे एकूण क्षेत्रफळ ५,८७७.३६ चौ. मी. म्हणजेच ६३,२६३.३७ चौ. फूट (खरेदीच्या कागदपत्रांनुसार) आणि ५,९६३ चौ. मी. म्हणजेच ६४,१८५.७३ चौ. फूट (साइटवरील भौतिक मोजमापांनुसार) आणि खालीलप्रमाणे त्यांचे आजूबाजू लागून असलेले म्हणजे सांगायचे की, उत्तरेस मिरा-साहिल को.ऑ.हौ.सो.लि. दक्षिणेस हॉटेल सरोजा पश्चिमेस मे. एस एन चाफेकर ॲन्ड कं. स्टुडिओ आणि पूर्वेस पश्चिम द्रुतगती महामार्ग आणि त्यावर बांधण्यात आलेली एकटी उभी / स्वतंत्र औद्योगिक इमारत ज्यात पुढील बाबीचा समावेश आहे: (i) तळ मजला ज्याचे क्षेत्रफळ १६,०६६ चौ. फूट (ii) पहिला मजला ज्याचे क्षेत्रफळ २४,७३२ चौ. फूट आणि (iii) दुसरा मजला ज्याचे क्षेत्रफळ ११,६४१ चौ. फूट आकार असून जिचे एकूण क्षेत्रफळ ५२,४३९ चौ. फूट (बाहेरील भिंतीपासून बाहेरील भिंतीपर्यंतचे अंगभूत क्षेत्र) असे आहे.

मुंबई, दिनांक : २२ जानेवारी २०२१

पेटीट फ्लूर
८५, रानडे रोड,
शिवाजी पार्क, दादर (पश्चिम),
मुंबई - ४०० ०२८

एस शाह अँड असोसिएट्सकरिता
हस्ता/-
(शशांक शाह)
भागीदार
ॲडव्होकेट्स अँड सॉलिसिटर्स
(एल.डी.शाह अँड कंपनी यांची सहयोगी फर्म)

राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक
प्लॉट सं. सी-24, जी ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई 400051

रूचीचे प्रकटीकरण

राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (नाबार्ड), डेटा मॅनेजमेंट, ॲनॅलिटिक्स आणि बिझनेस इंटेलिजन्स सोल्यूशन्सचे कार्यान्वयन करण्यासाठी बंद लिफाफ्यात सुप्रतिष्ठित पुरवठादारांकडून रूची प्रकटीकरण (एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट-इओआय) आमंत्रित करत आहे. रूची असणाऱ्या वेंडरांनी आमची वेबसाइट **www.nabard.org** ला भेट देऊन अधिक तपशील जाणून घ्यावा व त्यात नमूद केलेल्या पद्धतीनुसार अर्ज करावा.

इओआय प्राप्त करण्याचा अंतिम दिनांक 15 फेब्रुवारी 2021 आहे.

गाँव बढ़े >> तो देश बढ़े www.nabard.org Taking Rural India >> Forward

L&T Technology Services

एल ॲण्ड टी टेक्नॉलॉजी सर्व्हिसेस लिमिटेड
(लार्सन ॲण्ड टूब्रो लिमिटेडची उपकंपनी)
CIN: L72900MH2012PLC232169
नोंदणीकृत कार्यालय: एल्. ॲण्ड टी. हाऊस, एन्. एम्. मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४०० ००१
दूरध्वनी: (९१ २२) ६७५२ ५६५६; **फॅक्स:** (९१ २२) ६७५२ ५८९३
ई-मेल: investor@ltts.com; **वेबसाईट:** www.LTTS.com

टपाली मतदानाची सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनीज (मॅनेजमेंट ॲण्ड ॲडमिनीस्ट्रेशन) रूल्स, २०१४ च्या नियम २० आणि २२ सहवाचित कंपनीज ॲक्ट, २०१३ च्या सेक्शन ११० च्या तरतूदींच्या अनुरोधाने आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाद्वारे वितरीत ८ एप्रिल, २०२० दिनांकित सामान्य परिपत्रक क्र. १४/२०२०, १३ एप्रिल, २०२० दिनांकित सामान्य परिपत्रक क्र. १७/२०२०, १५ जून, २०२० दिनांकित सामान्य परिपत्रक क्र. २२/२०२० आणि २८ सप्टेंबर, २०२० दिनांकित सामान्य परिपत्रक क्र. ३३/२०२० आणि ३१ डिसेंबर, २०२० दिनांकित सामान्य परिपत्रक क्र.३९/२०२० (''एमसीए परिपत्रक'') आणि सिक्युरिटीज ॲण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टींग ऑब्लीगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्यूलेशन्स, २०१५ च्या रेग्यूलेशन ४४ आणि सर्वसाधारण सभेवरील सेक्रेटरीयल स्टॅण्डर्ड्स २ आणि अमलात असलेल्या अन्य कायदे आणि विनियमांच्या अनुपालनामध्ये, कंपनी भागधारकांद्वारे केवळ इलेक्ट्रॉनिक साधनांमार्फत (''ई-व्होटींग'') टपाली मतदानाच्या मार्गाने मंजूर करण्यात येणाऱ्या खालील प्रस्तावित ठरावांवर मंजुरी प्राप्त करीत आहे.

१) डॉ. केशब पांडा (डीआयएन : ०५२९६९४२) यांची कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक म्हणून ३१ मार्च, २०२१ पर्यंत मुदतीचा विस्तार आणि त्यांची १ एप्रिल, २०२१ पासून कंपनीचे बिगर-कार्यकारी संचालक म्हणून नियुक्ति करणे - सामान्य ठराव;

२) श्री. अमित चड्ढा (डीआयएन : ०७००६१४९) यांची कंपनीचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आणि पूर्ण - वेळ संचालक म्हणून ३१ मार्च, २०२१ पर्यंत मुदतीचा विस्तार आणि त्यांची १ एप्रिल, २०२१ पासून ३१ मार्च, २०२४ पर्यंतच्या तीन वर्षांच्या मुदतीसाठी कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ति करणे - सामान्य ठराव;

३) श्री. चंद्रशेखरन रामकृष्णन (डीआयएन : ००५८०८४२) यांची कंपनीचे स्वतंत्र संचालक म्हणून नियुक्ति करणे - सामान्य ठराव;

४) श्री. सुदीप बॅनर्जी (डीआयएन : ०५२४५७५७) यांची कंपनीचे स्वतंत्र संचालक म्हणून पुनर्नियुक्ति करणे - विशेष ठराव;

ज्यांचे ईमेल पत्ते कंपनी / डिपॉजिटरीजकडे नोंदविलेले आहेत त्या सभासदांना एमसीए परिपत्रक आणि सेबी परिपत्राकाच्या अनुसार केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमातून टपाली मतपत्रिका पाठविण्यात येतील. टपाली मतदानाची सूचना कंपनीच्या संकेतस्थळ अर्थात www.LTTS.com, स्टॉक एक्सचेंजेस अर्थात बीएसई लिमिटेडच्या www.bseindia.com आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडियाच्या www.nseindia.com संकेतस्थळावर सुध्दा उपलब्ध आहे.

तुमचा मेल आयडी कंपनी / डिपॉजिटरीकडे अगोदरपासून नोंदणीकृत असल्यास, ई-मतदानासाठी लॉगइन तपशील तुमच्या नोंदणीकृत ईमेल पत्त्यावर पाठविण्यात येईल.

ज्यांचे ईमेल आयडी कंपनी / डिपॉजिटरीजकडे नोंदणीकृत नाहीत त्या भागधारकांना रिमोट ई-व्होटींग प्रक्रियेमध्ये भाग घेणे शक्य होण्यासाठी, कंपनीने उपरोक्त नमूद परिपत्रकाच्या परिभाषेमध्ये, ई-मेल आयडी नोंदणीकृत करण्यासाठी आरटीएसोबत योग्य व्यवस्था केली आहे. प्रक्रिया खालील प्रमाणे आहे:-

भौतिक धारणा	einward.ris@kfintech.com येथे विनंती पत्र, फोलियो क्र., भागधारकाचे नाव, आणि भाग प्रमाणपत्राची स्कॅन्ड प्रत (पुढील आणि मागील), पॅन कार्ड (स्व-साक्षांकित स्कॅन्ड प्रत) आणि आधार कार्ड (स्व-साक्षांकित स्कॅन्ड प्रत) सोबत ईमेल पाठवून, कंपनीच्या निबंधक आणि भाग हस्तांतरण एजन्ट केफिन टेक्नॉलॉजिस प्रायव्हेट लिमिटेड यांना संपर्क करा.
डिमॅट धारणा	तुमच्या डीपीद्वारे दिलेल्या प्रक्रियेनुसार, तुमच्या डिमॅट खात्यामध्ये तुमचा ईमेल पत्ता नोंदणी करण्यासाठी संबंधीत डिपॉजिटरी पार्टीसीपंटना संपर्क करा.

संचालक मंडळाच्या आदेशान्वये
एल ॲण्ड टी टेक्नॉलॉजी सर्व्हिसेस लिमिटेड करिता
कपिल भल्ला
कंपनी सचिव
सभासद क्र. एफ३४८५

स्थळ : मुंबई
दिनांक : २१ जानेवारी, २०२१

MCXCCL

मल्टी कमॉडिटी एक्स्चेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेड

एक्स्चेंज स्क्वेअर, सुरेन रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९३, भारत
सीआयएन: U74999MH2008PLC185349 | ई-मेल आयडी: ig-mcxccl@mcxccl.com | संकेतस्थळ: https://www.mcxccl.com

३१ डिसेंबर, २०२० रोजी संपलेल्या तिमाही व नऊमाहीसाठी अलेखापरिक्षित आर्थिक परिणामांचे सार

(₹ लाखांमध्ये)

तपशील	संपलेली तिमाही ३१ डिसेंबर २०२० अलेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३० सप्टेंबर २०२० अलेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३१ डिसेंबर २०१९ अलेखापरीक्षित	संपलेली नऊमाही ३१ डिसेंबर २०२० अलेखापरीक्षित	संपलेली नऊमाही ३१ डिसेंबर २०१९ अलेखापरीक्षित	संपलेले वर्ष ३१ मार्च २०२० लेखापरीक्षित
१. प्रचालनातून एकूण उत्पन्न (इतर उत्पन्न)	२,२५८.३१	२,६१९.७१	१,६३७.४६	६,६१५.२३	५,१४८.८६	७,१५३.१३
२. कालावधीकरिता निव्वळ नफा (कर अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींपूर्वी)	८३०.३९	१,४१४.२२	५९६.८१	२,८७१.११	१,८६८.९८	२,६७१.५५
३. कालावधीकरिता करापूर्वीचा निव्वळ नफा (अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींनंतर)	८३०.३९	१,४१४.२२	५९६.८१	२,८७१.११	१,८६८.९८	२,६७१.५५
४. कालावधीकरिता करानंतरचा निव्वळ नफा (अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींनंतर)	८३०.३९	१,४१४.२२	६८७.८९	२,८७१.११	१,९५७.२६	२,७९२.१५
५. कालावधीकरिता एकूण व्यापक उत्पन्न [(कालावधीकरिता सर्वसमावेशक नफा (करानंतर) आणि इतर व्यापक उत्पन्न (करानंतर)]	८२३.८८	१,४२१.५४	६७७.२५	२,८६५.५६	१,९४६.६२	२,७८०.४०
६. समभाग भांडवल (₹१०/- प्रति शेअर)	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०
७. राखीव (पुनर्मूल्यांकन निधी वगळून मागील वर्षाच्या लेखापरिक्षित ताळेबंदात दर्शविल्यानुसार)	-	-	-	-	-	(१८,७५०.८४)
८. प्रत्येक समभागाचे उत्पन्न (₹१०/- प्रत्येकी)*						
मूलभूत (₹)	०.३५	०.५९	०.२९	१.२०	०.८२	१.१६
सौमिकृत (₹)	०.३५	०.५९	०.२९	१.२०	०.८२	१.१६

*अंतरिम कालावधीसाठी प्रति समभाग उत्पन्न हे वार्षिक नाही.

सूचना:

१. वरील तक्ता त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे सार आहे. त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे पूर्ण स्वरूप कंपनीचे संकेतस्थळ **www.mcxccl.com** वर उपलब्ध आहे.

२. वरील निष्कर्षांचे पुनरावलोकन लेखापरीक्षा समितीकडून दिनांक २० जानेवारी, २०२१ रोजी, केले गेले आहे आणि दिनांक २१ जानेवारी, २०२१ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत त्यांना मान्यता मिळाली आहे.

मल्टी कमॉडिटी एक्स्चेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेड करिता
स्वाक्षरी/-
नरेंद्र अहलावत
व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी

ठिकाण: मुंबई | दिनांक: २१ जानेवारी २०२१